मध्यवर्ती भांडार वि./ व.शि. /५६ /२०२६
इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी
दि. ४ / ८ /२०२६

## दरपत्रक / कोटेशन

महानगरपालिकेच्या सर्व नोंदणीकृत बचत गट (SHG) / स्थानिक विक्रेता नोंदणी प्रमाणपत्र पुरवठाधारक यांना कळविणेत येते की, इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये दिनांक ०९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट. २०२६ या कालावधीत "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत विविध कार्यक्रम / उपक्रमांचं आयोजन केले असून सदर कामी आपले दरपत्रक दि. ४/०८/२०२६ ते दि. ७ /०८/२०२६ अखेर पर्यंत मनपाच्या भांडार विभागाकडील टेंडर पेटीमध्ये दुपारी २.०० वा. पर्यंत जमा करणेचे आहे. प्राप्त दरपत्रक दि. ७ / ०८/२०२६ दुपारी ४.०० वा. उघडणेत येईल.

| अ.क्र. | ॲटम | द्यावयाचा दर |
|---|---|---|
| १ | **तिरंगा ध्वज**<br>**साईज – १.५ x २**<br>(Flag Code of India नुसार असणे आवश्यक ) | |

**अ) तांत्रीक बोलीसाठी कागदपत्र**

१) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र
२) GST नोंदणी प्रमाणपत्र
३) पॅनकार्ड

**ब) लिफाफा क्र. ०२ मधील खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.**

१) दरपत्रक/ कोटेशन प्रत्येक आयटमचे स्वतंत्र अंकी नमुद करावे.

अटी शर्ती

१. बयाणा रक्कम प्राप्त सर्वात कमी दरपत्रक / कोटेशनच्या 1% प्रमाणे महानगरपालिकेच्या भांडार विभागाकडे रोखीने /बिलातून वसूल करणेत येईल.
२. सदरचे दर हे GST व म.न.पा. चे सुचनेनुसार जागेवर पोहच (वाहतूक) देणेचे आहेत.
३. म.न.पा.स लागतील तसे व सांगेल त्या ठिकाणी मुदतीत वरील कामगीरी पूर्ण करुन देईन तक्रार करणार नाही
४. सदर कामाची पुर्तता ही पुरवठा आदेश दिलेनंतर करणेची आहे.
५. करार योग्य त्या किमतीच्या स्टॅम्पवर स्वखर्चाने महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या नमुन्यात करून दिला पाहिजे.
६. पुरवठा करावयाच्या मालाची किंवा वस्तुची किंमत सर्व टॅक्स व GST सह असली पाहिजे व त्याबाबत तसा स्पष्ट खुलासा असला पाहिजे.
७. आलेले दरपत्रक /कोटेशन पैकी दर कोणताही कमीचा अगर जास्तीचा मंजूर अगर नामंजूर करण्या अधिकार महानगरपालिकेस राखून ठेवला आहे. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.
८. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल सर्व संबंधीत तरतूदी लागू राहतील.
९. सदर कामा संबंधी अधिक माहिती मध्यवर्ती भांडार विभागाकडे मिळेल.

Kadam

विद्या कदम
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका